**बाब क्रमांक : २७४/१**

**विषय :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक १२.१०.२०१७ रोजी झालेल्या २७३ व्या बैठकीचे प्रारुप कार्यवृत्त स्थायी करण्याबाबत.**

---

उक्त विषय सचिव/प्राधिकरण यांनी सभागृहापुढे सादर केला.

सन्माननीय सदस्यानी बैठकीच्या प्रारुप कार्यवृत्तांतात दुरुस्ती न सुचविल्याने सदर कार्यवृत्त एकमताने स्थायी करण्यात आले.

**बाब क्रमांक : २७४/३**

**विषय :- श्री.पी.एम.वर्गीस, उप अभियंता/मुं.मं.(सेवाबडतर्फ) यांनी विभागीय चौकशीनुसार सेवा बडतर्फीच्या अंतिम आदेशाविरुध्द दाखल केलेले अपिल.**

---

**ठराव क्रमांक : ६७७१** **दिनांक : ३०/१०/२०१७**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, श्री.पी.एम.वर्गीस, उप अभियंता ( सेवाबडतर्फ )/ मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ हे विभागीय चौकशीनुसार सेवा बडतर्फीच्या अंतिम आदेशाविरुध्द दाखल केलेल्या अपिल सुनावणीत निर्णय घेतला कीं, श्री.वर्गीस यांच्यामुळे म्हाडा प्राधिकरणास मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान झालेले असल्याने त्याबाबत त्यांच्या दोषारोपांची सेवानिवृत्त भा.प्र.से.अधिकारी यांचेमार्फत नियमाप्रमाणे रितसर विभागीय चौकशी करुन चौकशी अहवालातील निष्कर्षाप्रमाणे शिस्तभंग विषयक प्राधिकारी यांनी बजावलेली शिक्षा योग्य असल्याने त्यांची शिक्षा कायम ठेवण्यात यावी तसेच श्री.वर्गीस यांना प्राधिकरणाकडून कोणतेही सेवालाभ देण्यात येवू नयेत यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

**बाब क्रमांक : २७४/४**

**विषय :- श्री.व्ही.बी.तिवारी, शाखा अभियंता यांनी सेवानिवृत्तीपुर्वी त्यांच्या विभागीय चौकशीच्या अंतिम आदेशाविरुध्द दाखल केलेले अपिल.**

---

**ठराव क्रमांक : ६७७२** **दिनांक : ३०/१०/२०१७**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, श्री.व्ही.बी.तिवारी, शाखा अभियंता यांनी त्यांच्या सेवानिवृत्तीपूर्वी झालेल्या विभागीय चौकशीच्या अंतिम आदेशाविरुध्द दाखल केलेल्या अपिल अर्जाच्या सुनावणीत निर्णय दिला कीं, श्री.तिवारी यांना सेवाकाळात विक्रोळी सत्र न्यायालयाने दिलेल्या शिक्षेविरुध्द मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या प्रलंबित अपिल प्रकरणी त्यांचेवर मुलत: असलेल्या आरोपातून गुणवत्तेवर ( On Merit )निर्दोष मुक्तता झाली नसून त्यांनी वादी व्यक्तीबरोबर तडजोड केल्यामुळे मा.उच्च न्यायालयाने श्री.तिवारी यांना मुक्त केल्याचे दिसून येते. श्री.तिवारी हे गुणवत्तेवर ( On Merit ) निर्दोष मुक्त झाले नसल्यामुळे त्यांचेवर जे आरोप होते ते कायम राहतात व त्यांच्या गैरवर्तणुकीमुळे म्हाडा प्राधिकरणाची बदनामी झाली असल्याने अपिलकार श्री.व्ही.बी.तीवारी यांचा म.ना.से. (शिस्त व अपिल ) नियम-५ (१) मधील तरतुदीनुसार त्यांची दोन वर्षांची वेतनवाढ रोखली जावी व निलंबन कालावधी क्षमापित करण्यात येऊ नये व तो कायम ठेवण्यात यावा, यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

विषयसूचीवरील विषयांवर चर्चा करुन निर्णय घेतल्यानंतर बैठकीचे पदसिध्द अध्यक्ष तथा उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण यांनी उपस्थित सन्माननीय सदस्यांचे आभार मानले व बैठक समाप्त झाल्याचे जाहीर केले.